# यज्ञ : एक सर्वश्रेष्ठ साधना

बापट गुरुजी

**प्रस्तावना** – अतिशय प्राचीन समजल्या जाणाऱ्या भारतीय संस्कृतीने या जगाला काही विशेष देणग्या दिल्या आहेत. यज्ञसाधना ही त्यातील एक महत्त्वपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण देणगी होय! भारतीयांच्या आणि एकंदरच मानवसमाजाच्या दुर्दैवाने कालौघात यज्ञसाधनेमधील आध्यात्मिक आणि वैज्ञानिक सिद्धांतांचा योग्य प्रचार आणि प्रसार न झाल्यामुळे या साधनेचे ज्ञानयुक्त आचरण लोप पावत चालले आहे.

यज्ञसाधनेचा उगम वेदांमध्ये आढळतो. ईशशक्तीच्या विविध रूपांना उद्देशून केलेल्या सर्व वैदिक प्रार्थना, या यज्ञदेवतेला केलेल्या प्रार्थना आहेत. यज्ञ हे देवांचे मुख असून त्याद्वारे विविध देवतारूपांतील वैश्विक शक्तीला दिलेले हविर्द्रव्य हे त्या त्या देवतेला प्राप्त होते. ही वैदिक समाजाची धारणा म्हणजे यज्ञसाधनेचा पाया आहे. निसर्गाच्या चिंतनशील निरीक्षणातून आपल्या पूर्वसूरींना प्रकाशशक्तीचे दृश्य-अदृश्य सृष्टीतील अनन्यसाधारण महत्त्व जाणवले होते व त्याचा उपयोग मानवी अभ्युदयासाठी कसा करून घ्यावा याचे ज्ञान त्यांनी करून घेतले होते, हे निश्चित! किंबहुना म्हणूनच श्रीमद् भगवद्गीतेनेही यज्ञाचे महत्त्व नाकारलेले नाही. गीतेच्या तिसऱ्या अध्यायातील ९ ते १६ क्रमांकाचे श्लोक वैदिक यज्ञाला उद्देशून आहेत, ज्यामध्ये निष्काम कर्मयोगाद्वारे निसर्गाचा समतोल राखणारे चक्र यज्ञाद्वारे चालवण्याचा निर्देश आहे.

हवनात्मक याज्ञिक भाग, त्याला दिलेली वैश्विक शक्तीच्या प्रार्थनेची जोड आणि त्याद्वारे सर्वांचे कल्याण असे मूळ स्वरूप असलेल्या वैदिक यज्ञसाधनेत कालांतराने त्यामागील ज्ञानाचे भान सुटले. परिणामतः त्यात संकुचित हेतुपूर्तीचा स्वार्थ व तात्पुरत्या सुखाची अभिलाषा शिरली. त्या अनुषंगाने त्यात काही अपप्रवृत्तीही बळावल्या. परंतु यज्ञसाधनेचे बहिरंग कितीही बदलले, तरी त्याचे अंतरंग कायम राहिल्याने यज्ञसाधनेचा अपप्रचार होऊनही ती नामशेष मात्र झाली नाही. आजही काही ठिकाणी यज्ञ केले जातात, परंतु साधनारूपात ज्ञानदृष्टिसहित यज्ञसाधना फार कमी ठिकाणी स्वीकारलेली दिसते. ज्योतिर्साधना अथवा अग्निहोत्र साधना यांना यज्ञसाधनेचेच संक्षिप्त रूप म्हणता येईल. अशा साधना मात्र काही ठिकाणीच आचरल्या जाताना दिसतात. आजच्या आधुनिक काळातही यज्ञसाधनेचे संदर्भ तेवढेच स्वीकारार्ह आहेत, हे यज्ञसाधनेचा वैज्ञानिक दृष्टिकोनातून विचार केल्यानंतर समजून येते.

**अग्नी आणि प्रकाश** – मानवी उत्क्रांतीचा विचार करता उत्क्रांतीच्या प्राथमिक टप्प्यातील दोन शोध सर्वात लक्षणीय ठरले आहेत. त्यातला पहिला म्हणजे अग्नीचा शोध आणि दुसरा म्हणजे भाषा शास्त्राचा विकास. त्यापुढील काळात चक्राच्या शोधाने मानवाच्या भौतिक उत्क्रांतीला अधिक गती मिळाली, तरी प्राथमिक स्थितीतला पहिला शोध म्हणजे अग्नीचा शोध. अग्नी म्हणजे ऊर्जा! अग्नी म्हणजे प्रकाश! आणि अग्नी म्हणजे गती! अग्नीच्या या विविध गुणवैशिष्टयांचा वापर मानवाने, उत्क्रांतीमधल्या विविध टप्प्यांमध्ये अत्यंत कौशल्याने केलेला आढळतो.

भारतीय संस्कृतीमध्ये प्राचीन काळापासून अग्नीला अनन्यसाधारण महत्त्व देण्यात आले आहे. त्यामुळे जन्मापासून ते दहन विधीपर्यंत केले जाणारे सोळा संस्कार अग्नीशी निगडीत आहेत. आजच्या आधुनिक काळातही 'अन्न शिजवणे' या सर्वसामान्य दैनंदिन प्रक्रियेपासून ते महाबलाढ्य औद्योगिक यंत्रापर्यंत कुठे ना कुठे तरी ऊर्जेचा उपयोग केला जातो मग ती विद्युत प्रकारातली ऊर्जा असेल, चुंबकीय ऊर्जा असेल किंवा या व्यतिरिक्त देहांतर्गत चयापचय क्रिया घडवून आणणारी आणखीन कोठल्या भिन्न स्वरूपातली ऊर्जा असू शकेल. अत्याधुनिक अशा दळणवळणाच्या आणि संदेश वहनांच्या यंत्रणाही ऊर्जेशिवाय चालू शकत नाहीत. म्हणजेच संदेश वहन हा अग्नीचा अजून एक गुणधर्म, जो मानवाच्या प्रगतीमध्ये

क्रांतिकारक ठरला आहे, त्याची सिद्धता येथे आपोआप होते.

प्रकाशाची गती दृश्य विश्वात सर्वात जास्त, म्हणजे सुमारे तीन लाख कि. मी. प्रति सेकंद एवढी आहे. आधुनिक विज्ञान असे सांगते की ज्याची गती सगळ्यात जास्त, त्याची शक्ती सगळ्यात जास्त! यानुसार दृश्य सृष्टीत प्रकाश सर्वात जास्त शक्तिमान ठरतो. हेतू हा नेहमी गतीबरोबर प्रवास करतो, म्हणूनच म्हणूनच सत्कर्मांच्या हेतूने केलेली यज्ञसाधना, ही सत्कर्मांचा गुणाकार करते. प्रकाशाखालोखाल ध्वनीचे माध्यम गतिमान समजले जाते. याचाच अर्थ कोणताही संदेश अत्यंत वेगाने आणि अचूकपणे पाठवायचा असेल तर प्रकाश आणि ध्वनी यांचा संयुक्त उपयोग सर्वाधिक प्रभावशाली ठरतो.

या सर्व गुणवैशिष्टयांचा उत्तम समन्वय साधत यज्ञ संकल्पनेची निर्मिती प्राचीन काळातल्या शास्त्रज्ञांनी म्हणजे ऋषि-मुनींनी केली. दुर्दैवाने या वैज्ञानिक बैठकीचा ऊहापोह त्यांनी आपल्या वाङ्मयात केला नाही. परंतु या एकाच कारणासाठी, वैदिक काळापासून अलिकडच्या काळातल्या अनेक सत्पुरुषांनी ज्या यज्ञ साधनेचा पुरस्कार केला ती साधना पद्धती म्हणजे निर्हेतुकपणे केलेला केवळ एक कर्मकांडात्मक उपचार आहे असा समज कोणी करून घेईल, तर तो मनुष्य या श्रेष्ठ साधनेच्या लाभापासून केवळ अज्ञानापोटी वंचित राहील हे निश्चित.

**यज्ञ : व्याख्या आणि संकल्पना –** अग्नी हे यज्ञ साधनेचे मर्मस्थान अहे हे आपण बघितलं. परंतु अशा कुठल्याही अग्नीला यज्ञ म्हणता येईल का? स्वयंपाकासाठी प्रज्ज्वलित केलेली चूल किंवा थंडी पळवण्यासाठी पेटवलेली शेकोटी यांना यज्ञ संकल्पना जोडता येईल का? याचं उत्तर निश्चितपणे 'नाही' असे आहे. कारण इथे मुळातच हेतूचा प्रभाव असतो. स्वयंपाकासाठी प्रज्ज्वलित केलेल्या अग्नीला 'अन्न शिजवणे' या हेतूची सीमा असते. तर शेकोटीतला अग्नी 'थंडी पळवणे' या मर्यादित हेतूने चेतवलेला असतो. यज्ञाचा हेतू इतका मर्यादित ठेवणे अपेक्षित नाही. वैश्विक कल्याण, समाजाचं कल्याण आणि उपस्थितांपैकी प्रत्येकाचा आत्मोद्धार या श्रेष्ठ हेतूची जोडणी जेव्हा प्रकाशाच्या गतीला दिली जाते तेव्हा तीच यज्ञाची संकल्पना ठरते. सारांशाने, सद्हेतुपूर्वक निर्माण केलेला प्रकाश ही यज्ञाची सोपी, सुटसुटीत व्याख्या आहे.

कुठल्याही क्रियेमागील हेतू हा त्या क्रियेच्या परिणामाची दिशा ठरवत असतो. प्रकाश म्हणजे साक्षात गती! परंतु या गतीला योग्य हेतूची जोड दिली तरच त्याचा अपेक्षित परिणाम साध्य होतो. रोजच्या जीवनातले उदाहरण पाहिले, तर एखादा मुलगा ९७% गुण मिळवून परीक्षेत उत्तीर्ण झाला, तर त्याचे आई-वडील त्याच्या पाठीवर जोरजोरात थापा मारून त्याला शाबासकी देतील. परंतु हाच मुलगा जर ३२% मिळवून अनुत्तीर्ण झाला, तर तेच आई-वडील कदाचित त्याच्या पाठीवर बुक्काही मारतील! म्हणजे क्रिया एकच, त्यातली गतीही समान, परंतु हेतूच्या भिन्नतेमुळे पहिल्या प्रसंगी तो मुलगा आनंदित होईल, तर दुसऱ्या प्रसंगात मात्र त्याला चक्क रडू फुटेल!

तीच गोष्ट हिंसेची. सैनिकाने आपल्या देशरक्षणार्थ केलेली हिंसा त्याला मानपद बहाल करेल, तर स्वार्थप्रेरित हेतूने दरोडेखोराने केलेली हिंसा ही त्याला तुरुंगवास घडवेल. म्हणजे क्रिया तीच असली तरी हेतू बदलल्यामुळे परिणाम बदलतील. त्यानुसार सद्हेतुपूर्वक निर्माण केलेली गती ही यज्ञाची दुसरी सोपी व्याख्या. अत्यंत उदात्त अशा वैश्विक कल्याणाच्या हेतूने जेव्हा प्रकाशाची गती निर्माण केली जाईल, तेव्हा उत्तम संदेशवाहक असलेला प्रकाश निश्चितच मित्राप्रमाणे मदत करेल आणि आपले संदेश त्या वैश्विक शक्तीपर्यंत पोहोचवेल, मग ह्या शक्तीला कोणी ईश्वर म्हणोत, कोणी निसर्ग शक्ती म्हणोत! कोणी भगवान दत्तात्रेय म्हणोत किंवा सद्गुरुतत्त्व म्हणोत, नाव कोणतेही दिले तरी हरकत नाही पण शक्तीचे अस्तित्व सर्वांनाच मान्य असते.

यज्ञाची अजून एक व्याख्या करता येते. यज्ञ शब्दातला 'य' हा निर्मिती वाचक शब्द आहे, जसा कुंतीपासून निर्माण झालेला तो 'कौंतेय' किंवा राधेपासून निर्माण झालेला तो 'राधेय'. तर 'ज्ञ' या अक्षरातून 'ज्ञान' हा अर्थ ध्वनित होतो. म्हणजेच 'ज्ञानाची निर्मिती करणारा तो यज्ञ' ही यज्ञाची तिसरी व्याख्या झाली. इथे भौतिक ज्ञान नव्हे तर 'आत्मज्ञान' असा अर्थ अपेक्षित आहे. आण्विक शक्ती ही मानवजातीची उन्नती करेल की संहार घडवेल, याची फलश्रुती ज्याप्रमाणे ती शक्ती वापरणाऱ्याच्या हेतूवर अवलंबून असेल, अगदी त्याचप्रमाणे प्रकाशशक्ती देखील जो जशी कामना बाळगेल तसे त्याला परिणाम देईल. म्हणून यज्ञाला वेदांमध्ये व भगवद् गीतेतही कामधेनू म्हटले आहे. यज्ञसन्मुख जर निष्काम साधना केली, तर 'मी म्हणजे प्रत्यक्ष परमात्मा आहे' या आत्मज्ञानाची प्राप्ती यज्ञाद्वारे होऊ शकते. हा या सर्वांचा सारभूत अर्थ आहे.

वैश्विक कल्याणाचा, आत्मोद्धाराचा सर्वोच्च हेतू ठेवून ईश्वराला, त्या वैश्विक शक्तीला आर्त संदेश प्रकाशामार्फत पाठवणे ही यज्ञाची मूलभूत संकल्पना आपण बघितली. या संकल्पनेला प्रत्यक्षात उतरविण्यासाठी जी यज्ञसाधना

कराय्रची, त्याच्या उपकरणांचा, साधनांचाही विचार करू.

भारतीय अध्यात्मशास्त्राने मंत्र, तंत्र आणि विज्ञान अशी तीन शक्तीप्राप्तीची साधने सांगितली आहेत. साध्या व सोप्या भाषेत या तिन्हींची व्याख्या करायची म्हणजे मनाला त्राण देतो तो मंत्र, तनाला त्राण देते ते तंत्र आणि 'य' म्हणजे निर्मितीला त्राण देते ते यंत्र. या पद्धतीने विचार करता यज्ञ हे मंत्र आणि तंत्राचा समन्वय साधणारे सर्वोत्कृष्ट यंत्र आहे. यज्ञामध्ये मंत्राची जोड अपरिहार्य असते. यज्ञदेवतेची पूजा साधून त्याला तंत्राचीही जोड दिलेली असते. त्यासाठी तयार केलेली विशिष्ट आकार असणारी यज्ञवेदी ही एक यंत्रच असते. गमतीचा भाग म्हणजे सृष्टी ज्या आधारे व्यक्तात येते, त्या पंचमहाभूतांची उपस्थिती यज्ञात असते. माती आणि पाणी यांच्या साहाय्याने यज्ञवेदी बांधली जाते, त्यात चेतविलेला अग्नी हा तेजरूप असतो. त्याला मंत्र म्हणजेच शब्द ज्याच्या आश्रयाने राहतात त्या आकाश तत्त्वाची जोड दिलेली असते व यातून तयार होणारे धूम्र हे वायूचे रूप असते.

अध्यात्मशास्त्रात सांगितलेली शक्तिप्राप्तीची तीन साधने व पंचमहाभूते यांच्या एकत्रीकरणातून तयार झालेली यज्ञाचे हे साकार रूप होय. या साकार रूपाद्वारे आध्यात्मिक शक्ती प्राप्त करण्यासाठी काही अटींचे पालन करणे आवश्यक ठरते. त्यातील सर्वात महत्त्वाच्या म्हणजे एकाग्रता आणि एकत्रितता या दोन गोष्टींचा आपण अधिक सखोल विचार करूया.

**एकाग्रता आणि एकत्रितता** – मंत्रोच्चारण किंवा नामस्मरण, कोणत्याही स्वरूपातली प्रार्थना अग्नी समोर करताना मनाची एकाग्रता साधणं ही यज्ञाची सर्वात मोठी पूर्व अट आहे. मनाच्या सर्व शक्ती जेव्हा एका अग्रापाशी केंद्रित होतात तेव्हाच त्याला एकाग्रता साधणं असे म्हणतात. अगदी मोबाईलवरून आपल्या सहकाऱ्याशी बोलत असताना त्या संभाषणात जर आपली एकाग्रता नसेल तर ते उपकरण कितीही कार्यक्षम असले तरी आपला संदेश त्या व्यक्तीपर्यंत योग्य प्रकारे जाऊ शकत नाही आणि त्याच्याकडून मिळणाऱ्या प्रतिसादाचे ग्रहणही आपण करू शकत नाही. याचाच अर्थ कोणताही संदेश सुस्पष्टपणे, सुसंबद्धपणे आणि सुसंगतपणे पाठवायचा असेल तर आपलं त्या प्रक्रियेकडे संपूर्ण लक्ष केंद्रित व्हायला हवे.

उत्तम संदेशांच्या आदान प्रदान प्रक्रियेसाठी लागू असलेली ही पूर्व अट यज्ञासमोर केल्या जाणाऱ्या प्रार्थनांना सुद्धा लागू होते. एखाद्या मनुष्याने यज्ञासमक्ष मुखाने नामस्मरण किंवा मंत्रपठण सुरू ठेवले आणि मनात मात्र, 'आज भोजनाला काय असेल बरे? किंवा तो सहकारी माझ्याशी राजकारण का करतो?' हे आणि तत्सम सांसारिक विचार येत राहिले तर यज्ञ संकल्पनेला मूलतः छेद जाऊन ती संपूर्ण प्रक्रिया निरुपयोगी ठरण्याचा संभव असतो.

जसे मोबाईल उपकरणामध्ये विशिष्ट बटन दाबले असता, ते उपकरण 'सायलेंट मोड' वर जाते आणि आलेला संदेश आपल्या कानांपर्यंत पोहोचू शकत नाही, तद्वतच यज्ञासमक्ष हवन करत असताना आपल्या मनाला, बुद्धीला, चित्ताला शांत, एकाग्र राहण्याचे आदेश साधकाला देता आले तरच साधकाची प्रार्थना परमेश्वरापर्यंत पोहोचेल. तसेच समोर प्रज्वलित झालेल्या यज्ञप्रतीकामार्फत साधकाकडून केल्या जाणाऱ्या, नामस्मरणाचे, मंत्रोच्चारणाचे संस्कार चित्तावर पुनः पुन्हा ठसवता आले पाहिजेत आणि त्या वैश्विक शक्तीला शरणागतीचा, नमनाचा संदेश पाठवता आला पाहिजे. यासाठी या मंत्रांचे अनेकदा उच्चारण करणे आवश्यक असते.

एकाग्रतेबरोबरच एकत्रता ही यज्ञाची महत्त्वाची अट आहे. 'सहनाववतु। सह नौ भुनक्तु। सहवीर्यं करवावहै। (कठ. २/३/१९)' या प्रसिद्ध शांतीमंत्राचा सारभूत अर्थ 'आम्ही एकत्र येऊ, एकत्रितरीत्या कार्य करू' असा असून एकत्रतेची महती सांगणारा आहे. एकत्रिततेच्या सूत्रामध्ये, समष्टीला मिळाले की प्रत्येक व्यक्तीला आपोआप मिळते हे गणित अनुस्यूत आहे. वैदिक वाङ्मयात व्यक्तिकेंद्रित प्रार्थना फार अभावाने आढळून येतात, म्हणून वैदिक प्रार्थना आजही सर्वश्रेष्ठ आहेत. प्राचीन मंत्र, ऋचा, सूक्तांमध्ये अखिल समाजाच्या उन्नतीकरिता मागण्या मागितल्या आहेत.

पाश्चात्य संशोधकांनी सुद्धा एकत्रिततेमुळे निर्माण होणाऱ्या शक्तीचा अभ्यास करून त्या संशोधनाचे निष्कर्ष जगासमोर मांडले आहेत. लेडबिटर या थिऑसॉफीच्या प्रसिद्ध पाश्चात्य संशोधकाने गायत्री मंत्राच्या एकत्रित पठणातून निर्माण होणाऱ्या ऊर्जेचा अभ्यास, किर्लीन फोटोग्राफीच्या साहाय्याने करून असे निष्कर्ष मांडले की एका व्यक्तीने गायत्री मंत्राचे पठण केले असता जेवढ्या शक्ती शलाका निर्माण होतात त्यापेक्षा कित्येक पट अधिक ऊर्जेची निर्मिती गायत्री मंत्राच्या सामुदायिक पठणातून होते.

एकत्र साधनेमध्ये व्यक्तींच्या संख्येनुसार शक्तीची बेरीज न होता शक्तीचा गुणाकार होतो. उदाहरणार्थ शंभर साधकांनी एकत्र येऊन अथर्वशीर्षाचे शंभर वेळा पठण केले म्हणजे १००+१००+१००... असे शंभर वेळा, या

आहे. दुर्दैवाने मनुष्याच्या चंचल स्वभावामुळे कोणत्याही साधनेत त्याची एकनिष्ठता टिकत नाही आणि त्यामुळे इच्छित प्राप्ती होऊ शकत नाही. मानवी स्वभावाच्या चांचल्यावर आधारित असलेली एक मजेशीर गोष्ट इथे उद्धृत करता येईल.

**कांदे आणि फटके** – एक अतिशय क्षमाशील आणि न्यायप्रिय राजा होता. एकदा त्याच्या सेवकांनी एका चोराला पकडून त्याच्यासमोर हजर केले. राजासमोर त्या चोराने चोरी केल्याचा कबुलीजबाबही दिला. त्यामुळे निवाडा अजून सोपा झाला. राजा न्यायी असल्यामुळे त्याने चोरासमोर शिक्षांचे दोन पर्याय ठेवले आणि त्यातून एका शिक्षेची निवड करण्याची मुभा दिली.

राजाने चोराला सांगितले की, ''एक तर तू पन्नास फटके खा किंवा मग पन्नास कांदे तरी खाऊन दाखव! बोल, तू काय ठरवतोस?'' चोराने विचार केला, 'कांदे काय मी रोजच खातो, त्यामुळे पन्नास कांदे सहजपणे खाऊ शकेन!' चोराचा निर्णय ऐकून त्याच्यासमोर पन्नास कांदे आणले गेले. चोराने हिरिरीने पहिला कांदा खाल्ला, दुसरा खाल्ला, तिसरा, चौथा, पाचवा. मग मात्र त्याच्या जिभेची, तोंडाची आग होऊ लागली. त्याला वाटू लागलं, ''अरे, वाटते तेवढी ही शिक्षा सोपी नाही! त्यापेक्षा फटके खाणं परवडलं.'' चोराने फटक्याची मागणी करताच फटकेवाला आसूड हातात घेऊन हजर झाला आणि त्याने चोराला फटके द्यायला सुरुवात केली. पहिला फटका खाल्ला, दुसरा खाल्ला, तिसरा खाल्ला, त्यानंतर रक्ताच्या चिळकांड्या उडू लागल्या, पाठीची आग होऊ लागली. चोराला वाटू लागलं, ''या पद्धतीने पन्नास फटके खाऊन होईपर्यंत मी बेशुद्ध पडेन किंवा मरूनही जाईन कदाचित'. मग त्याने राजाला सांगितले, ''मला हे फटके नकोत, त्यापेक्षा मी कांदेच खातो!'' असं करता करता दिवसाच्या शेवटी त्या चोराने पन्नास कांदेपण खाल्ले आणि पन्नास फटके पण खाल्ले!

आलेले दु:ख ताबडतोब नाकारण्याची नेमकी हीच प्रतिक्रिया सामान्य मनुष्याची असते. साधना करताना कोणतेही दु:ख आले की सामान्य साधकाची साधनेवरची निष्ठा, श्रद्धा लगेचच डळमळीत होऊ लागते. यज्ञासह कोणतीही साधना जर दु:खाला घाबरून केली तर त्या साधनेतून काहीही साध्य होत नाही. 'जे दु:ख येत आहे ते माझ्या कर्मनियमांप्रमाणे येत आहे त्या दु:खाला मीच जबाबदार आहे व त्या गतकालीन दुष्परिणामांचा निचरा होण्यासाठीच मी ईश्वरी साधना करतो आहे' हा संकल्प जोपर्यंत आपल्या मेंदूत चांगल्या प्रकारे ठसत नाही तोपर्यंत कोणत्याही साधनेचा उपयोग होत नाही.

यज्ञ साधनेवर पूर्ण श्रद्धा आणि विश्वास निर्माण होण्यासाठी प्रथम या साधनेची विविध दृष्टिकोनातून सखोल माहिती साधकाने करून घ्यायला हवी. आधुनिक ज्ञान पद्धतीमध्ये शिक्षण घेतलेला साधक निश्चितपणे यज्ञ प्रक्रियेची वैज्ञानिक आणि तार्किक कारणमीमांसा मागणार. साधकाच्या या विविध शंकांचे परिमार्जन करण्यासाठी, आध्यात्मिक आणि आधुनिक विज्ञानातल्या सिद्धांतांचा आधार घेऊन यज्ञ संकल्पना सविस्तरपणे मांडण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखापासून सुरू झालेल्या लेखमालेतून आपण करणार आहोत.

क्रमशः

(श्रीगुरु सत्संग मंडळ वाशी यांच्या २०० व्या सत्संग बैठकीच्या निमित्ताने प. पू. सद्गुरु श्री. बापट गुरुजी यांनी केलेल्या व्याख्यानाच्या आधारे)

---

पान ४९ वरून.... योगवासिष्ठ

करण्याचा जर शब्द प्रयत्न करेल तर तेथे शब्दाचा काही एक अर्थ न होता तो शब्द देखील नाश पावेल.''

तैसी अविद्येसी सन्मुखे । सिद्धचि प्रतिसेदके ।
उठलिचि निरर्थके । जल्पे होती ।। ६८ ।।
अवसे आला सुधाकरू । न करिची काई अंध:कारू ।
अविद्यानाशी विचारू । तैसा होये ।। ६९ ।।
नाना न निफजतेन अन्ने । जेवने तेचि लंघने ।
निमालेन नयने । पाहणाचि अंधु ।। ७० ।।
कैसेन ही वस्तू नसे । तेथे जै शब्दाचा अर्थ हो बैसे ।
तैं निरर्थकपणे नाशे । शब्दही थिता ।। ७१ ।।

या प्रमाणे विविध नावांखाली, संकल्पनांखाली चालत असणारा अविद्येचा, अज्ञानाचा गोंधळ नष्ट करण्यासाठी श्री वसिष्ठांनी एकच जो उपाय सांगितला आहे तोच महत्त्वाचा आहे की, ''वैचारिक दृष्टया वाटेल तसे भटकणाऱ्या कुतर्कशक्तीच्या द्वारे योग्य तो सत्य निर्णय होऊ न देणाऱ्या, यथार्थ ज्ञान न होऊ देणाऱ्या या वितंडवादी (आजच्या भाषेत भौतिकवादी, संशयवादी) लोकांच्या भरीस न पडता सर्वच चैतन्यमय सृष्टीचा आविष्कार आहे त्यामुळे 'मन जड आहे का चेतन आहे' या विकल्पामध्ये न अडकता 'सर्वं खल्विदं ब्रह्म।' (मनासह) हेच चिंतन अखंडपणे ठेवणे इष्ट आहे.

क्रमशः